दावा क्रं. ४६६/१९९७
दि.१०/०४/२०२६

**गिरीष सोसायटी विरुध्द**
**शानु पटेल व इतर**
**निशाणी. १८३**
**दिनांक १०/०४/२०२६**

वादी संस्थेचे साक्षीदार क्र. १ श्रीमती उज्वला उदय हर्षे वय ७५, व्यवसाय निवृत्त यांचा वादी तर्फे ॲड श्री. पी. एम. मैंदर्गी यांच्या मार्फेत सरतपास शपथेवर सुरू...

१९. पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील माहिती मी माझ्या वकीलाना दिली होती. मी पुराव्याचे प्रतिज्ञापत्र वाचले असुन त्यातील माहिती बरोबर आहे व वाचुन मी त्यावर सही केली आहे.

२०. प्रतिवादी क्र. १ तर्फे ॲड श्री. एम. पी. पाटील यांच्या मार्फत उलटतपास सुरू.

मी २०१० साली संचालक मंडळाची सदस्य झाली. दाव्यात मी जी काही कागदपत्र दाखल केली आहे ती मी २०१० नंतर पाहिली. दाव्याच्या विषयाशी संदर्भातील जी काही कागदपत्र आहेत ती मी दाव्यात दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये असे कथन केले आहे की, संस्थेचे कागदपत्र पाहुन मी प्रतिवादी क्र. १ शानु पटेल यांची सही ओळखते. मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात असे कथन केले आहे की, प्र. क्र. १ हे १९८८ ते १९९४ संचालक मंडळाचे सभासद होते. १९८८ ते १९९४ दरम्यान संस्थेच्या रेकॉर्डवर प्र. क्र. १ शानु पटेल यांच्या ज्या काही सह्या आहेत त्या मी पाहिल्या आहेत.

२१. दाव्यामध्ये ज्या सभांचे ठराव आव्हानीत केले आहे त्यावेळी मी संस्थेची सभासद नव्हते आणि म्हणुन त्या सभांना हजर ही नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, ०३/०७/१९८८ च्या सभेचे इत्तिवृत्त कोणी लिहीले याची मला वयैक्तिक माहिती नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतात की, ज्या वेळी मी केसचे कागदपत्र पाहण्यास सुरुवात केली त्या वेळी ठराव क्र. ८ व ९ हे वेगळ्या हस्ताक्षरात लिहिलेले आहे.

२२. आता मला निशाणी १९५ चे मुळ इत्तिवृत्त पुस्तकातील दिनांक ०३/०७/१९८८ च्या सभेची इत्तिवृत्त दाखविण्यात आले. ठराव क्र. ७ नंतर अशी नोट लिहिली आहे की, “श्री. सामकांची प्रकृती बरी नसल्यामुळे पुढील कार्यवाहीची नोंद दुसऱ्या सदस्यानी केली आहे.” हे म्हणणे खरे आहे की, या नोट प्रमाणे त्या पुढील ठराव दुसऱ्या सभासदांने लिहीले आहे.

२३. हे म्हणणे खरे आहे की, ठराव क्र. ८ व ९ लिहिल्या नंतर उपस्थित सभासदांनी त्याखाली स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या सभासदांनी स्वाक्षऱ्या केल्या ते त्या दिवशी हजर होते म्हणुन त्यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. हे म्हणणे खरे आहे की, मि सभासद नसल्यामुळे माझ्या त्यावर सह्या नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, ज्या पानावर ठराव क्र. ८ व ९ लिहिलेला आहे ते पान इत्तिवृत्त पुस्तकातील पान आहे व हे पान नंतर समाविष्ठ केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०३/०७/१९८८ च्या सभेतील इत्तिवृत्तामध्ये प्र. क्र. १ शानु पटेल यांचा काहीही सहभाग नाही.

२४. आता मला निशाणी १३९ वरिल सभासद होण्यासाठी केलेल्या अर्जासोबत दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राची प्रत

दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, प्र. क्र. १ ने ज्या वेळी हे प्रतिज्ञापत्र संस्थेकडे हजर केले त्यावेळी मी संस्थेत उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिज्ञापत्रातील "सोसायटी कडुन सभासदास घर अगर जागा का पाहिजे त्याची माहिती" या रकान्यात लिहिलेले स्वत:चे घर व शाळेची इमारत हे हस्ताक्षर सारखेच आहे. हे म्हणणे खरे आहे की, "स्वताचे घर व शाळेची इमारत" हा मजकूर ज्यावेळी प्र. क्र. १ यानी लिहिला त्या वेळी मी हजर नव्हते. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, संस्थेकडे जे मुळ प्रतिज्ञापत्र आहे त्या मध्ये स्वत:चे घर व शाळेची इमारत या दोन शब्दांच्या पेनाच्या शाई मध्ये फरक आहे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०३/०७/१९८८ च्या इत्तिवृततातील ठराव क्र. ८ व ९ तसेच निशाणी १३९ च्या प्रतिज्ञापत्रातील शाळेची इमारत या मजकुरांची शाई वेगळी असल्या मुळे ते नंतर समाविष्ट केले असे मला वाटते. हे म्हणणे खरे आहे की, ०३/०७/१९८८ च्या इत्तिवृत्तातील व निशाणी १३९ च्या प्रतिज्ञापत्रातील मजकुर ज्या वेळी लिहीला गेला त्यावेळी मी तिथे उपस्थित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, हा मजकुर नंतर समाविष्ट केला असा माझा अंदाज आहे. हे म्हणणे खरे आहे की, वरिल मजकुर नंतर समाविष्ट केला हे संस्थेच्या इतर कोणत्याही इत्तिवृत्तामध्ये नमुद केलेले नाही.

२५. हे म्हणणे खरे आहे की, प्लॉट नं. ६२ हा या दाव्याचा विषय नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्लॉट नं. ६२ संदर्भात या दाव्यात मागणी नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रामध्ये खोटे सांगितले की, प्र. क्र. १ शानु पटेल यांनी संस्थेचे कागदपत्र गाहाळ केले.

२६. हे म्हणणे खरे आहे की, संस्थेच्या सभेचे इत्तिवृत्त लिहिल्यानंतर ते इत्तिवृत्त संस्थेच्या पुढील सभेत वाचुन कायम केल्या जाते. ०३/०७/१९८८ च्या सभेचे इत्तिवृत्त त्या पुढील सभेमध्ये कायम करण्यात आले किंवा कसे हे मी सांगु शकत नाही. ०३/०७/१९८८ च्या सर्वसाधारण सभेनंतर संस्थेची पुढील सर्वसाधारण सभा १९९० साली झाली. १९९० च्या सर्वसाधारण सभेचे इत्तिवृत्त दाव्यात का दाखल केले नाही ते मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, ०३/०७/१९८८ चे इत्तिवृत्त १९९० च्या सर्वसाधारण सभेत कायम झाले हे लपवण्यासाठी १९९० चे इत्तिवृत्त दाव्यात दाखल केले नाही.

२७. मि माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रातील प्ररिच्छेद क्र. ८ मध्ये ठराव क्र. ८ व ९ मध्ये मजकुर प्र. क्र. १ ने सचिव झाल्या नंतर समाविष्ट केला असे कथन केले आहे त्यावेळी मी संस्थेची सभासद नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, परिच्छेद क्र. ८ मध्ये केलेले कथन खोटे आहे. हे म्हणणे खरे आहे की, ०३/०७/१९८८ च्या सभेत जे सभासद हजर होते त्यांनी त्या सभेबाबत संस्थेत तक्रार केली नाही. साक्षीदार स्वत:हुन सांगतात की, आता ते सांगता येणार नाही कारण संस्थेचे त्यावेळचे रेकॉर्ड गाहाळ झालेले आहे. संस्थेचे रेकॉर्ड गाहाळ झाल्या बाबत उपनिबंधकाकडे संस्थेने तक्रार केल्याचे रेकॉर्ड संस्थेमध्ये उपलब्ध नाही. रेकॉर्ड गाहाळ झाल्याची तक्रार उपनिबंधकाकडे केली होती का हे मला माहिती नाही. या बाबत ऑडीट मध्ये आक्षेप आला होता का हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, संस्थेकडे जे रेकॉर्ड उपलब्ध आहे, त्या मध्ये संस्थेचे रेकॉर्ड गाहाळ झाल्याचा उल्लेख नाही. संस्थेचे रेकॉर्ड गाहाळ झाले हे मी संस्थेच्या रेकॉर्डला वाचले आहे. रेकॉर्ड गाहाळ

झाले हे मी जिथे वाचले ते रेकॉर्ड मी दाव्यात का दाखल केले नाही त्याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, संस्थेचे रेकॉर्ड गाहाळच झाले नाही व त्याचा उल्लेख संस्थेच्या रेकॉर्ड मध्ये नसल्यामुळे मी ते दाव्यात दाखल केले नाही.

२८. प्रस्तुतचा दावा संस्थेचे १९९७ चे चेअरमन श्री. केशवराव शंकरराव जाधव यांनी दाखल केला होता. दावा दाखल करण्यापूर्वी केशवराव जाधव यांनी शानु पटेल यांना नोटीस दिली होती किंवा कसे याची माहिती नाही. हे महणणे खरे आहे की, नोटीसची प्रत संस्थेच्या रेकॉर्डला नाही. केशवराव जाधव यांना दावा दाखल करण्याचा अधिकार देणारा ठराव झाला किंवा नाही हे मला माहिती नाही. असा ठराव झाल्याचे संस्थेंच्या रेकॉर्ड मध्ये माझ्या पाहण्यात आलेले नाही.

वकिलांच्या विनंतीवरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

**समक्ष,**

**श्रीमती, अंजु जाधव**
**न्यायाधीश,**
**सहकार न्यायालय क्र. १ पुणे.**

सही/-
साक्षीदार:- श्रीमती. उज्वला उदय हर्षे
दिनांक:- १०/०४/२०२६